# इतिहास

## इयत्ता अकरावी











# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-2116/(प्र.क्र.43/16) एसडी-4 दिनांक 25.4.2016 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक 20.06.2019 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन 2019-20 या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# इतिहास

## इयत्ता अकरावी

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

N3X5P5

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तकाद्वारे त्या-त्या पाठाला संबंधित असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
पुनर्मुद्रण : ऑक्टोबर २०२०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती**

डॉ.सदानंद मोरे, अध्यक्ष
डॉ.शुभांगना अत्रे, सदस्य
डॉ.सोमनाथ रोडे, सदस्य
डॉ.सतिश चापले, सदस्य
डॉ.प्रिया गोहाड, सदस्य
डॉ.नलिनी वाघमारे, सदस्य
डॉ.प्रशांत देशमुख, सदस्य
सौ.वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

**इतिहास अभ्यासगट समिती**

डॉ.शिवानी लिमये
श्री.वैजनाथ काळे
डॉ.धनंजय चौधरी
प्रा.श्रीधर घुंडरे
श्री.समीर मानकर
डॉ.धनाजी मासाळ
श्री.कृष्णा देशमुख
डॉ.सिद्‌धार्थ जाधव
प्रा. अनुरथ काळे
श्री.बाळकृष्ण चोपडे
डॉ. मुशीर शेख
श्री.संदीप डोईफोडे
श्री.बाळासाहेब चावरे
डॉ.सचिन डेंगळे
श्रीम.शिवकन्या कदेरकर
प्रा.नागेश कदम
डॉ.रावसाहेब शेळके
श्री.मोहन शेटे
प्रा.अश्विनी बेडगे
प्रा.सुषमा नानगुडे

**निमंत्रित**

डॉ.गणेश राऊत
श्री.मोगल जाधव

**लेखक**

डॉ.शुभांगना अत्रे
डॉ.प्रिया गोहाड

**मुखपृष्ठ व सजावट** : श्री.देवदत्त बलकवडे
**नकाशाकार** : श्री.रवीकिरण जाधव
**अक्षरजुळणी** : मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
**कागद** : ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/Qty.- 50,000
**मुद्रक :** M/s. Adarsha Vidyarthi Prakashan, Pune

**संयोजक**

सौ.वर्षा सरोदे
सहायक विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे,
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता अकरावीपासून इतिहास विषय तुम्ही स्वतंत्रपणे अभ्यासणार आहात. इसवी सनपूर्व काळापासून सुरुवात करून मध्ययुगीन इतिहासापर्यंतची, भारताच्या संदर्भातील तसेच महाराष्ट्रातील मानवी, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाची वाटचाल सुसूत्रपणे या पाठ्यपुस्तकाच्या साहाय्याने उलगडणार आहे. इयत्ता अकरावीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

कुशल मानवाने घडवलेली पहिली दगडी हत्यारे ते आजच्या युगातील यंत्रमानव आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या मानवी वाटचालीच्या इतिहासातील क्रिया-प्रक्रियांची साखळी सामाजिक-सांस्कृतिक इतिहास घडवत असते. इतिहास शिकताना तो साकल्याने समजण्यासाठी ही क्रिया-प्रक्रियांची साखळी समजली तर इतिहासाचा अभ्यास आपल्या वर्तमान जीवनाचा सांधा अतीताशी जोडणारा असतो. त्यामुळे इतिहास हा विषय अधिक रंजक, ज्ञानदायी आणि ज्ञानरचनेला पूरक होतो.

जगभर विखुरलेल्या मानवी समाजाने प्रगतीचे अनेक टप्पे पार करत, अश्मयुग ते आधुनिक युग ही वाटचाल आणि त्या वाटचालीच्या विविध कालखंडांतील विविध घटनांचा इतिहास आपण दहावीपर्यंत सलगपणे शिकलो. या घटना मानवी इतिहासाच्या विविध टप्प्यांवरील स्थित्यंतरांचे केवळ निर्देशक असतात. मात्र स्थित्यंतरांसाठी कारणीभूत असलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, तंत्रज्ञानीय अशा विविध स्तरांवरील प्रक्रियांचा विचार करणे आवश्यक असते. अशा प्रकारच्या प्रक्रिया इतिहासाच्या घडणीत अत्यंत महत्त्वाच्या असतात. प्रक्रियात्मक साखळीचे आकलन होण्याची क्षमता वाढीस लागली, तर विद्यार्थ्यांमधील ज्ञाननिर्मितीच्या क्षमतेचेही पोषण होईल, हा विचार या पुस्तकाच्या मांडणीचा मूलभूत आधार आहे.

इतिहास विषयाचा अभ्यास करताना तुम्हांला QR कोडवर देण्यात येणारे साहित्य, पाठांत दिलेल्या माहितीपर रंजक, कृतियुक्त विविध चौकटी, रंगीत चित्रे, नकाशे, विविध उपक्रम यांची खूप मदत होईल. त्याचबरोबर पाठांत दिलेल्या लिंकच्या साहाय्याने तुम्हांला अधिक उपयुक्त माहितीही आंतरजालाच्या साहाय्याने मिळवता येईल.

अकरावीतील इतिहास विषयाच्या अध्ययनाने तुमच्या भावी आयुष्यातील ध्येय साकारण्याच्या मार्गावरील वाटचालीला एक निश्चित दिशा मिळेल. तुमच्या महाविद्यालयीन वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २० जून २०१९
भारतीय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ १९४१

## – शिक्षकांसाठी –

इयत्ता अकरावीत प्रवेश करणारा विद्यार्थी आयुष्यातल्या एका नवीन वळणावर येऊन पोचलेला असतो. माध्यमिक शाळेचा उंबरठा ओलांडून कनिष्ठ महाविद्यालयात येणाऱ्या या विद्यार्थ्यांचा एका नव्या जगात प्रवेश होणार असतो. त्याच्या आयुष्यातील हे एक महत्त्वाचे संक्रमण आहे. आतापर्यंत तो जे काही शिकला, त्याचा आढावा घेऊन त्याला या इयत्तेत एक पाऊल पुढे टाकायचे आहे. त्याने निवडलेल्या विषयात अधिक खोलवर जाऊन त्याचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. त्याचा उपयोग त्याला भविष्यातील व्यावसायिक कारकिर्दीच्या संदर्भातील निर्णय घेण्यासाठी होईल. अकरावीतील ज्ञानार्जनाने त्यांच्या भावी आयुष्यातील ध्येय साकारण्याच्या मार्गावरील वाटचालीला एक निश्चित दिशा मिळेल.

विद्यार्थ्यांच्या भावी महाविद्यालयीन प्रवासासंबंधीचा हा दृष्टिकोन विचारात घेऊन इयत्ता अकरावीच्या पाठ्यपुस्तकाची रूपरेषा तयार केलेली आहे. त्यानुसार या पुस्तकाद्वारे माध्यमिक स्तरावर शिकलेल्या इयत्ता सहावी ते इयत्ता दहावीपर्यंतच्या इतिहासाचा एकत्रित आढावा घेण्यास त्यांना मदत होईल. जणू काही ते त्यांना आधीच परिचित असलेल्या प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासाच्या मार्गिकांवरून पुन्हा एकदा फेरफटका मारतील. त्यायोगे त्या मार्गिकांवरील बारकावे आणि सौंदर्य समजून घेण्यासाठी ते सज्ज होतील; इतिहास हा सैद्धान्तिक पातळीवरही त्यांना आवडू लागेल. या पाठ्यपुस्तकाच्या द्वारे या सर्व गोष्टी सहज घडून याव्यात असा प्रयत्न आहे. ते सहज शक्य होईल कारण अकरावीच्या विद्यार्थ्यांमध्ये मिळवलेल्या माहितीचे विश्लेषण-संश्लेषण करून विषयाचे सखोल आकलन करून घेण्याची पुरेशी क्षमता माध्यमिक अभ्यासक्रमाच्या आधारे विकसित झालेली आहे.

अकरावीमधील विद्यार्थ्यांची आकलनक्षमता पुरेशी विकसित झालेली असल्यामुळे सामाजिक-राजकीय पातळीवर घडणाऱ्या घटनांच्या मुळाशी त्या त्या समाजाची सामूहिक भावनिकता आणि मानसिकता कार्यरत असते, याचे आकलन सहजपणे होऊ शकेल. अशा पद्धतीने हे पाठ्यपुस्तक विद्यार्थ्यांची स्वतंत्र विचारशक्ती विकसित होण्यास साह्यभूत ठरेल. हे फक्त इतिहासाच्या अभ्यासापुरतेच मर्यादित नसेल, तर त्यांच्या भावी आयुष्यातील प्रत्येक वळणावर तसेच त्यांनी निवडलेल्या व्यवसायक्षेत्रामध्ये, या क्षमता त्यांच्यासाठी उपयोगी ठरतील.

नकाशावाचनाचे कौशल्य आणि त्याच्या आधारे ऐतिहासिक माहिती भौगोलिक संदर्भांच्या चौकटीत समजून घेता येणे, ही गोष्ट इतिहासाच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असते. म्हणून पुस्तकात आवश्यक तेथे ऐतिहासिक नकाशांचा समावेश केलेला आहे. त्यातील माहितीला पूरक अशी माहिती स्वयंअध्ययनाद्वारे मिळवण्यास विद्यार्थ्यांना मदत व्हावी म्हणून योग्य ते आंतरजाल दुवे म्हणजेच वेबलिंक्सही दिलेल्या आहेत.

या पाठ्यपुस्तकामध्ये १०००० वर्षांहूनही अधिक अशा अत्यंत प्रदीर्घ कालखंडाचा इतिहास सामावलेला आहे. इसवी सनपूर्व ८०००-७००० च्या सुमारास भारतीय उपखंडामध्ये विविध ठिकाणी प्राथमिक अवस्थेतील शेतीची सुरुवात झाली. या काळापासून सुरुवात करून मध्ययुगीन इतिहासापर्यंतची सुसूत्र मांडणी या पुस्तकात केलेली आहे. एवढ्या प्रदीर्घ कालखंडातील सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाच्या वाटचालीची मांडणी भारताच्या संदर्भात करत असताना, प्रत्येक पाठ त्या वाटचालीतील एकेका टप्प्याचा प्रातिनिधिक ठरावा अशा पद्धतीने पाठांची रचना केलेली आहे. अर्थातच या पद्धतीच्या मांडणीमध्ये ऐतिहासिक कालक्रम आधारभूत असला तरी त्यामागील संकल्पनात्मक आणि प्रक्रियात्मक साखळी स्पष्ट करण्यावर अधिक भर देण्यात आला आहे.

पहिल्या चार पाठांमध्ये इसवी सनपूर्व १०००० ते ७०० या कालखंडांतील म्हणजे ९००० वर्षांहूनही अधिक कालखंडांतील इतिहासपूर्व काळ उलगडलेला आहे. पाठ ५ ते ९ या पाच पाठांमध्ये प्राचीन भारताच्या इतिहासाची मांडणी केलेली आहे. पाठ १० आणि ११ मध्ये प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडांमधील संक्रमणकालाचा विचार केलेला आहे. पाठ १२ आणि १३ मध्ये जवळजवळ ४५०० वर्षांच्या काळात प्राचीन भारतीयांच्या साहसपूर्ण इतिहासाचा आणि त्या अनुषंगाने दूरवरच्या प्रदेशांपर्यंत भारतीय संस्कृतीच्या झालेल्या प्रसाराचा आढावा घेतलेला आहे. शेवटच्या तीन पाठांत भारताच्या मध्ययुगीन इतिहासाचा आढावा घेण्यात आला आहे. हे पाठ्यपुस्तक भारताच्या इतिहासाविषयीचे असले, तरी महाराष्ट्र हा एक वैशिष्ट्यपूर्ण भूप्रदेश आहे हे लक्षात घेऊन महाराष्ट्राचे ऐतिहासिक संदर्भ ठळकपणे स्पष्ट व्हावेत याकडे विशेष लक्ष पुरवण्यात आले आहे.

या पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून इतिहास शिकताना विद्यार्थ्यांच्या मनामध्ये त्यासंबंधीचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन सहजगत्या रुजत जावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आला आहे. तो साध्य करण्यासाठी संशोधनामधून पुढे आलेली नवीन माहिती तसेच विशेष पूरक माहिती चौकटींमध्ये देण्यात आली आहे. हेतू हा की विद्यार्थ्यांच्या मनामध्ये कुतूहल निर्माण व्हावे, त्यांच्या मनात विषयाची रुची निर्माण व्हावी आणि त्यांनी स्वयंस्फूर्तीने विषयाचे अध्ययन करावे.

हे पुस्तक तुमच्या हातात देत असताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. आम्हाला हा विश्वास आहे की, तुम्ही या पुस्तकाचे स्वागत कराल.

## • क्षमता विधाने •

| क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | घटक १ :<br>इतिहासपूर्व काळातील भारत<br>(महाराष्ट्राच्या संदर्भासह) | • इतिहासपूर्व काळ ही संज्ञा स्पष्ट करता येणे.<br>• इतिहासपूर्व काळामध्ये भटक्या जीवनाकडून स्थिर जीवनाकडे झालेले संक्रमण स्पष्ट करता येणे.<br>• या संक्रमणाच्या प्रक्रियेमधील शेतीचा शोध आणि शेतीच्या उत्पादनाचे टप्पे, तसेच त्या अनुषंगाने बदललेल्या जीवनशैलीचे स्वरूप सांगता येणे.<br>• स्थिर गाव-वसाहतींच्या उदयाचे आणि व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करता येणे.<br>• नागरीकरणाच्या प्रक्रियांचे स्वरूप सांगता येणे.<br>• व्यापाराचा उत्कर्ष आणि नगरांचा विकास यांमधील सहसंबंध आणि परस्परावलंबित्व जोडता येणे.<br>• व्यापाराचा ऱ्हास आणि नगरांचा ऱ्हास यांमधील परस्पर संबंध शोधता येणे. |
| २. | घटक २ :<br>इ.स.पू. ६ व्या – इ.स.पू. ३ ऱ्या शतकाआधीचा भारत (महाराष्ट्राच्या संदर्भासह) | • इतिहास काळ आणि लिखित साहित्य यांच्यातील संबंध स्पष्ट करता येणे.<br>• प्राचीन भारतातील सुरुवातीची राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था यांची चिकित्सा करता येणे.<br>• दुसऱ्या नागरीकरणाच्या काळामध्ये झालेल्या राजकीय आणि सामाजिक, तंत्रवैज्ञानिक, आर्थिक, धार्मिक स्थित्यंतरामागील प्रक्रियेचे अर्थनिर्वचन करता येणे.<br>• प्राचीन काळामध्ये भारतीयांचा बाहेरील प्रदेशांशी आलेला संपर्क नकाशाच्या मदतीने स्पष्ट करता येणे.<br>• भारतात उदयाला आलेले पहिले साम्राज्य आणि त्यामागील पार्श्वभूमी सांगता येणे.<br>• भारत व इतर देशांशी आलेला संपर्कमार्ग नकाशा आराखड्यात दर्शवता येणे. |
| ३. | घटक ३ :<br>इ.स.पू. ६ व्या ते इ.स.१३ व्या शतकापर्यंतचा भारत<br>(महाराष्ट्राच्या संदर्भासह) | • मौर्य साम्राज्यानंतर उदयाला आलेल्या साम्राज्याच्या काळात प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये विविध क्षेत्रांत बदल घडून आले, त्याचे स्वरूप स्पष्ट करता येणे.<br>• दक्षिण भारतातील विविध राजसत्तांची चिकित्सा करता येणे.<br>• या काळात भारतीय व्यापार पश्चिमेकडे रोमपर्यंत पोचला होता याची चिकित्सा करता येणे.<br>• काही शतकांनंतर भारतीय व्यापाराची क्षितिजे विस्तारली आणि आग्नेय आशियातील देशांपर्यंत भारतीय व्यापारी पोचले. व्यापाराच्या बरोबरीने भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला. याची जाणीव होऊन प्राचीन भारतीय इतिहासाबाबत अभिमान वाटणे.<br>• प्राचीन भारतीय व्यापारी मार्ग जगाच्या आराखड्यात दाखवता येणे.<br>• भारतीय संस्कृतीच्या प्रसाराची ठिकाणे नकाशा आराखड्यात दर्शवता येणे. |
| ४. | घटक ४ :<br>इ.स.१३ ते १९ व्या शतकापर्यंतचा भारत<br>(महाराष्ट्राच्या संदर्भासह) | • मध्ययुगीन भारतातील राजकीय स्थिती स्पष्ट करता येणे.<br>• अरबांच्या आक्रमणाविषयी माहिती स्पष्ट करता येणे.<br>• अल्लाउद्दीन खल्जी आणि देवगिरीचे यादव यांच्यांतील राजकीय संघर्षाची कारणे स्पष्ट करणे.<br>• व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रांतील प्रगतीविषयी माहिती प्राप्त करणे.<br>• शहरीकरणाची प्रक्रिया स्पष्ट करता येणे.<br>• या काळातील कला, साहित्य, स्थापत्याच्या क्षेत्रांतील प्रगतीविषयी माहिती सांगता येणे.<br>• भारतात मुघल सत्तेच्या स्थापनेची कारणमीमांसा करणे.<br>• या काळातील जमीन महसूल व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करणे.<br>• छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याविषयी विश्लेषण करणे.<br>• शिवकालीन राज्यव्यवस्था समजावून घेणे.<br>• पेशवेकाळाविषयी माहिती स्पष्ट करता येणे.<br>• छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यविस्तार भारताच्या नकाशा आराखड्यात दर्शवता येणे.<br>• पेशवेकालीन राज्यविस्ताराची ठिकाणे भारताच्या नकाशा आराखड्यात दर्शवता येणे. |

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | आद्य शेतकरी.................................... | १ |
| २. | भारतातील आद्य नगरे............................ | ११ |
| ३. | भारतातील ताम्रपाषाणयुगीन गाव-वसाहती........... | २१ |
| ४. | वैदिक काळ ....................................... | २८ |
| ५. | जनपदे आणि गणराज्ये .............................. | ३४ |
| ६. | भारतातील दुसरे नागरीकरण ......................... | ३८ |
| ७. | भारत आणि इराण (पर्शिया)......................... | ४८ |
| ८. | मौर्यकालीन भारत.................................. | ५६ |
| ९. | मौर्योत्तर काळातील भारत........................... | ६४ |
| १०. | भारतीय इतिहासातील नवे पर्व ....................... | ६९ |
| ११. | दक्षिण भारतातील राजसत्ता ......................... | ७७ |
| १२. | भारत, वायव्येकडील देश आणि चीन ................ | ८४ |
| १३. | भारत, श्रीलंका आणि आग्नेय आशिया............... | ९१ |
| १४. | दिल्लीची सुलतानशाही, विजयनगर आणि बहमनी राज्य | १०२ |
| १५. | मुघलकालीन भारत................................. | ११० |
| १६. | स्वराज्य ते साम्राज्य ................................ | ११७ |



• **S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2019. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.